**Mumbai: MMRDA maintains 11,000 plus labourers , within the various labour camp of various infrastructure projects within MMR .**

RA Rajeev , Metropolitian Commissioner took a Review meeting with the Heads of Department of the MMRDA via video conferencing on Monday.

The foremost on the agenda was the well-being of all the labourers engaged by contractors on various projects like Metro ,MTHL,surya water project SCLR , kalanagar junction and various other bridges.

Metropolitan Commissioner MMRDA said that at present there were 5444 labourers for various metro lines under execution , 5042 labourers on MTHL , and 576 labourers on other infrastructure projects within MMR. He further added that MMRDA has succeeded to avoid the migration of it's labourers ,which was insisted by Shri Uddhav Thackery Hon.CM of Maharashtra. All labourers are fit and sound in health .

RA Rajeev further directed the HODs to ensure that these labourers do not face any hardships.

"All labourers staying in labour camps are given all necessary medical facilities including food. Sanitation in labour camps is mantained . regular health check-up are also conducted said RA Rajeev ; He further directed to conduct surprise visits to labour camps to asses the situation in regular intervals.

MMRDA will bear the additional cost incurred to maintain these daily expenses of labourers as force measure clause ; These expenses will be reimbursed to concerned contractors. Metropolitian commissioner further directed the Financial adviser , director ( projects) and director ( works) to calculate the optimum subsistence allowance to be given to concerned contractors in accordance to the provision of the directives issued by GOI vide circular dated 19 February 2020.

MMRDA will also make monthly salaries of staff, appointed through outsourcing agency , as the facility to work from home is being also given to them. Monthly salaries of security staff and housekeeping staff shall be done in time .

RA Rajeev ,directed all HODs to assess the impact of lockdown and reschedule target for every project including system works for metro.

MMRDA will also contribute one days salary about 17 lakh plus to CM relief fund .

Metropolitian commissioner also expressed his pleasure that despite of ongoing lockdown many crucial decisions were taken using vedio conference. Tasks were given to HOD's . That will necessary help to minimise the impact cause by corona outbreak .

**एमएमआरडीएकडून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांसाठी काम करणाऱ्या ११००० कामगारांची उत्तमरीत्या देखभाल करीत आहे**

एमएमआरडीएचे आयुक्त आर. ए. राजीव यांनी सोमवारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत एमएमआरडीएच्या महत्वाच्या म्हणजे मेट्रो प्रकल्प, एमटीएचएल, सूर्या जलप्रकल्प, एसएलआर, कलानगर जंक्शन आणि पूलांसारख्या इतर प्रकल्पांसाठी काम करणाऱ्या मजुरांच्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. सध्या हे सर्व मजूर सुस्थितीत आहेत. एमएमआरडीएचे आयुक्त आर. ए. राजीव यांनी सांगितलं विविध मेट्रो प्रकल्पांसाठी काम करणाऱ्या मजूरांची संख्या ५४४४ आहे. एमटीएचएलसाठी काम करणाऱ्या मजूरांची संख्या ५०४२ आहे. तसेच एमएमआरमधल्या इतर प्रकल्पांसाठी काम करणाऱ्या मजूरांची संख्या ५७६ आहे.एकुण ११०६५ मजुर आहेत .माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेलया निर्देशाप्माने एमएमआरडीएसाठी काम करणाऱ्या या सर्व मजूरांना स्थलांतर करण्यापासून थांबवण्यात एमएमआरडीए यशस्वी झाल्याचं आयुक्त आर. राजीव यांनी सांगितलं.

एमएमआरडीएसाठी काम करणाऱ्या मजुरांना सध्याच्या लॉकडाऊनच्या परिस्थितीत कोणत्याही अडचणी येऊ नयेत, त्याची खबरदारी सर्व विभाग प्रमुखांनी घेण्याचे निर्देश महानगर आयुक्त राजीव यांनी दिले.

सर्व कामगार सध्या 'कामगार छावण्यांमध्ये' राहत आहेत. त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचा पुरवठा केला जात आहे ,यामध्ये रोजचं जेवण, कामगार छावण्याची स्वच्छता आणि डॉक्टरांकडून नियमित आरोग्य तपासणी करून घेणे हे करणाचे निर्देश दिले. त्याचबरोबर अभियंत्यांनी या कामगार छावण्यांना भेटी देऊन पाहावी .

एमएमआरडीएसाठी काम करणाऱ्या सर्व कामगारांच्या इतर खर्चासाठी निर्वाह भत्ता देण्यात येईल. कामगारांच्या देखभालीसाठी लागणारा खर्च कंत्राटदारांना कडुन करण्यात येईल. याची परतफेड कंत्राटदारांना एमएमआरडीएकडून केली जाईल. आयुक्त आर. ए राजीव यांनी भारत सरकारकडून १९ फेब्रुवारी २०२० रोजी काढलेल्या परिपत्रकाच्या निर्देशानुसार वित्तीय सल्लागार, प्रकल्प संचालक आणि संचालक (कामे) यांना सदरची रक्कम ठरवण्याचे निर्देश दिले.

त्याचबरोबर आऊटसोर्सिंग कंपन्याद्वारे नियुक्त केलेल्या कामगारांना त्यांचा पगार नियमित मिळेल. कारण या कामगारांना घरातून काम करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सुरक्षारक्षक कर्मचारी आणि सफाई कर्मचारी यांचेही वेतन वेळेत दिले जाईल.

लॉकडाऊनमुळे एमएमआरडीएच्या प्रकल्पांवर झालेल्या परिणामांचे मूल्यांकन करून त्यानुसार पुढची उद्दीष्टं आणि प्रकल्पांच्या मुदतीत बदल करण्याचे आयुक्त राजीव यांनी सर्व विभाग प्रमुखांना निदेश दिले .

एमएमआरडीचया अधिकारी /कमृचारी यांचा एक दिवसाचा पगार, म्हणजे १७ लाखांपेक्षा अधिक रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देत आहे.

कोरोनाच्या संकटामुळे असलेल्या लॉकडाऊनमध्येही सुरू असलेल्या प्रकल्पासंदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याच महानगर आयुक्तांनी सांगितलं. त्याचबरोबर कोरोनामुळे एमएमआरडीएच्या सुरू असलेल्या प्रकल्पांवर कमीतकमी परिणाम होण्यासाठी सर्व प्रकल्पांच्या विभाग प्रमुखांना कामाचं ऊदीषट देण्यात आलं आहे.